मुलाखत क्र. २

# प्रेमाच्या पाऊलवाटा

**प्राचीन भारतीय परंपरेपासून ते आधुनिक मानसशास्त्रापर्यंत सेक्स हा विषय आपल्या दैनंदिन आरोग्य, तणाव, मन आणि आत्म्याशी घट्ट जोडलेला आहे. लैंगिकता, सेक्स, अंतरंगता आणि प्रेम यांविषयीचे अज्ञान, संभ्रम, मिथकं व असुरक्षितता; तसेच वैयक्तिक प्रश्न, संकोच व अनुभव मोकळेपणाने व्यक्त करता यावेत यासाठी वैद्यकशास्त्राधारित सशक्त व्यासपीठ उभारणारे भारतातील अग्रगण्य नाव म्हणजे डॉ. सबीहा. BAMS, Former ICF ACC Coach, Licensed Emotional Intelligence Coach, Master in NLP (Neuro-Linguistic Programming) Founder DSCC (Dr. Sabiha Coaching Consulting) या माध्यमातून एक स्त्री, पत्नी, आई, डॉक्टर या सर्व ओळखींसह डॉ. सबीहा यांनी आजवर १०,००० हून अधिक दांपत्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवले आहे. जागतिक पातळीवर 'सर्वोत्तम रिलेशनशिप कोच' असलेल्या; प्रेमा-भिव्यक्तीला नवी दिशा देणाऱ्या व्यक्तिमत्त्वासोबत केलेला हा प्रेम-संवाद.**

## डॉ. सबीहा इनामदार



**भारतासारख्या रूढी परंपरागत देशात ज्या विषयावर व्यक्त व्हायलाही सर्वसामान्यांना जमत नाही किंवा भीती वाटते, अशा विषयात आपण गेल्या २० वर्षांपासून निष्ठेने काम करत आहात. नियमित वैद्यकीय क्षेत्रातून यशस्वी होणे सहज शक्य असतानाही, आपण या विषयाकडे कसे वळलात?**

मी आयुष्याबद्दल कधी ठोस नियोजन केले नव्हते. अभ्यासात प्रामाणिक होते, योगायोगाने डॉक्टर झाले आणि मेडिकल क्षेत्रातच पुढे जायचे एवढेच ठाऊक होते. लग्नाची संकल्पना मात्र माझ्यासाठी खूप स्पष्ट होती. आईवडिलांचे सुरक्षित, प्रेमळ कुटुंब हेच माझे आदर्श होते. त्यामुळे कॉलेजमध्ये असतानाच मला लग्नाची ओढ होती आणि अरेंज मॅरेज झाले.

लग्नापेक्षा वेडिंगची झळाळी मला अधिक आकर्षक वाटत होती; विवाहानंतरचे वास्तव मला माहीतच नव्हते. १६ जानेवारीपर्यंत मी 'मुलगी' होते आणि १७ जानेवारीपासून 'सून' हा बदल इतका अचानक होता की त्याचा अर्थच मला उमगला नाही. सुरक्षित मातीत वाढलेले माझे आयुष्य जणू मुळासकट उपटून दुसऱ्या शेतात लावले गेले. तिथे आपोआप रुजणे अपेक्षित होते, पण ते सहज शक्य झाले नाही. हा संक्रमणाचा संघर्ष मला हळूहळू समजत गेला आणि मी या विषयाकडे वळले.

**''प्रेम'' या शब्दात संपूर्ण ब्रम्हांड सामावलेलं आहे, असे म्हटले जाते. प्रत्येकाची प्रेमाची संकल्पना वेगवेगळी आहे. पण तरीही, सर्वसामान्य दृष्टीने प्रेम म्हणजे नेमके काय? नात्यांमध्ये; विशेषत: पती-पत्नीच्या नात्यांमध्ये या प्रेमाचा protocol कसा असला पाहिजे?**

''प्रेमाचा प्रोटोकॉल'' हा शब्द जरी थोडा नॉन-रोमॅंटिक वाटत असला तरी, प्रेमालाही काही जाणवणाऱ्या, अनुभवता येणाऱ्या पद्धती असतात. प्रेम तेच जे दिसतं, व्यक्त होतं आणि ज्यामध्ये श्‍वास घेता येतो. जिथे गुदमरायला होतं, जिथे नातं वाढत नाही, तिथे प्रेम नसतं. प्रेमाला बंदिस्त परिभाषेत बांधण्याची गरज नाही; मात्र दोन माणसांचं प्रेम एकमेकांपर्यंत पोहोचतंय का? हे समजणं महत्त्वाचं आहे. माझं प्रेम समोरच्याला ऐकू जातंय का? दिसतंय का? स्पर्शातून जाणवतंय का? याची जबाबदारी घ्यावी लागते. कारण प्रेम करणं जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच ते समोरच्याला स्वीकारता येणंही आवश्यक आहे.

प्रेमाला ठरावीक फॉर्म्युला नसतो. ते स्वच्छंद, बेफाम असतं. वय, वेळ, जात, धर्म अशा कोणत्याही चौकटींपलीकडे जाणारं. प्रेम हलकं करतं, उंचावून नेऊन 'क्लाऊड नाईन'वर पोहोचवतं. ते केवळ भावना नसून शरीरात, डोळ्यांत, शब्दांत सतत वाहणारं एक भावनिक प्रवाह असतं. प्रेम म्हणजे 'इमोशनल मोशन' जे वाहत राहतं, बदलत राहतं, वेगवेगळ्या रूपांत व्यक्त होत राहतं. जसं पाणी नदीतून, वाफेतून, ढगांतून प्रवास करतं, तसंच प्रेमही आहे. वाहणं थांबलं, तर प्रेम राहत नाही.

**आजच्या समाजात ''प्रेम'' आणि ''सेक्स'' या दोन संकल्पनांमध्ये फार गोंधळ दिसतो. प्रेमात शारीरिक जवळीक ही गरज आहे की, फक्त भावनिक नात्याचा परिणाम?**

प्रेम आणि सेक्स या दोन वेगळ्या संकल्पना नसून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. सेक्स ही केवळ शारीरिक कृती नाही; ती प्रेम व्यक्त होण्याची एक अत्यंत प्रभावी भाषा आहे. गोंधळ तेव्हा होतो, जेव्हा आपण शारीरिक जवळीक आणि भावनिक गरज यांना परस्परविरोधी मानतो. प्रत्यक्षात दोन्ही एकमेकांत गुंफलेल्या असतात, जसं शब्द वेगळे

असले तरी भाव एकच असतो.

प्रेमाची अभिव्यक्ती ठरावीक फॉर्म्युल्यात बसत नाही. भूक लागली म्हणून जेवण, वेळ झाली म्हणून जेवण, किंवा इच्छा झाली म्हणून जेवण, मात्र जेवण एकच असतं; कारणं वेगवेगळी असतात. तसंच प्रेमही. कुणासाठी स्पर्शातून, कुणासाठी शब्दांतून, कुणासाठी नजरेतून, कुणासाठी उपस्थितीतून तर कुणासाठी शारीरिक जवळिकीमधून प्रेम पोहोचतं. प्रत्येकाची 'भाषा' वेगळी असते. ज्यांना शारीरिक जवळीक महत्त्वाची वाटते, ते कमी भावनिक असतात असं नाही; आणि ज्यांना संवाद, ऐकणं, स्पर्श, सहवास हवाय, ते प्रेम कमी करतात असंही नाही. अडचण तेव्हा निर्माण होते जेव्हा, दोघांच्या प्रेम व्यक्त करण्याच्या पद्धती वेगळ्या असतात, आणि एकमेकांच्या गरजा समजून घेतल्या जात नाहीत.

**सेक्स किंवा अंतरंग म्हणजे केवळ क्रिया नाही;**अ

**तर प्रेम व्यक्तीकरण, आत्म–जाणिवा आणि परस्पर समज यावर आपण भर देता. आधुनिक जीवनशैलीत सेक्सबद्दलचा हा ''सूक्ष्म'' दृष्टिकोण लुप्त होत असल्याची कोणती कारणे आपल्याला दिसतात?**

'सेक्स' हा शब्द भाषांनुसार बदलतो; पण त्यामागची भावना एकच असते. जसं राग ही भावना असून ती वेगवेगळ्या कृतींमधून व्यक्त होते. जसं की; ओरडणं, गप्प बसणं, वस्तू फोडणं इ. तसंच सेक्सही एक भावना आहे. ती प्रेमाची भावना आहे आणि ती शरीराच्या माध्यमातून, स्पर्शातून, जवळिकीच्या विविध कृतींमधून व्यक्त होते. समस्या सेक्समध्ये नाही, तर आपण त्याला दिलेल्या भीतीत आहे. या एका कृतीभोवती इतके नियम, बंधनं, लपवाछपवी आणि चारित्र्याचे शिक्के लावले गेले आहेत की प्रेमाचा मूळ अर्थच झाकला गेला आहे. प्रेम नसताना जर केवळ कृती उरली, तर माणूस आणि प्राणी यातला फरक पुसट होतो. म्हणूनच सेक्स ही प्रेमाची भाषा आहे, केवळ जैविक प्रक्रिया नाही.

भीतीची कारणंही आहेत; शारीरिक गरजा, बळजबरीची शक्यता, गर्भधारणेची भीती, गैरसमज, अपुरं किंवा चुकीचं शिक्षण. जसं भूक भागवण्यासाठी चुकीचा मार्ग निवडला, तर दुसऱ्याचं नुकसान होतं; तसंच इथेही अज्ञानामुळे विकृती निर्माण होते. म्हणूनच या विषयावर बोलणं, समजावून घेणं, शिक्षण देणं आवश्यक आहे. प्रेमाला दाबून ठेवण्याऐवजी ते सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि समजूतदारपणे कसं व्यक्त करता येईल हे शिकवणं हेच तज्ज्ञांचं काम आहे. व्याख्यानं, प्रश्नोत्तरं, लेखन यामागचा उद्देश एकच, लोकांना हे कळावं की यावर बोलता येतं, शिकता येतं, समजून घेता येतं. कारण सेक्स हे गणित नाही; ते समजून घ्यायचं मानवी नात्यांचं संवेदनशील शास्त्र आहे.

**काही नात्यांमध्ये प्रेम असतं पण सेक्स नाही; काही ठिकाणी सेक्स असतो, पण प्रेम नाही. हे शक्य आहे का? असं का घडतं?**

मानसिक आकर्षण आणि शारीरिक आकर्षण या वेगळ्या गोष्टी आहेत. मानसिक जुळवणीतून प्रेम निर्माण होतं, पण त्याला शारीरिक ओढ जोडली जाईलच असं नाही. कधी भूतकाळातील अनुभव, शारीरिक मानसिक अडथळे, भीती किंवा जखमा आड येतात. त्यामुळे केवळ प्रेम आहे म्हणून शरीर आपोआप प्रतिसाद देईल, अशी अपेक्षा वास्तवाशी जुळत नाही. जिथे सेक्स आहे तिथे प्रेम असायलाच हवं, किंवा जिथे प्रेम आहे

तिथे सेक्स घडायलाच हवं, असा नियम आयुष्यात चालत नाही. यामागे असंख्य कारणं असतात आणि त्या कारणांवर वाद घालण्यापेक्षा वास्तव स्वीकारणं महत्त्वाचं आहे.

अनेक दांपत्यं वर्षानुवर्षे विवाहबंधनात असून नियमित शारीरिक संबंध ठेवतात; तरी तिथे प्रेम, आदर, सन्मान किंवा भावनिक जवळीक असेलच असं नाही. तसंच काही नाती अतिशय प्रेमळ असतात, पण शारीरिक आकर्षण किंवा जवळीक सहज वाटत नाही. दोन्ही परिस्थिती अस्तित्त्वात आहेत आणि दोन्ही चुकीच्या नाहीत. म्हणूनच प्रेमाला किंवा सेक्सला एकमेकांचे लेबल लावणं धोकादायक आहे. नातं जिथे श्वास घेऊ शकतं, जिथे मोकळेपणा आहे, समज आहे आणि सुरक्षितता आहे, तिथेच खरं नातं जगतं

**''प्रेम'' आणि ''विवाह'' या दोन गोष्टी एकमेकांत गुंतलेल्या असल्या तरी अनेकदा त्या वेगळ्या वाटतात. विवाह 'नंतर'चे प्रेम आणि विवाहा 'बाहेरील' प्रेम, यात नेमका फरक काय असतो?**

विवाहाची सुरुवात प्रेमाच्या पायावरच व्हायला हवी. मग ते प्रेम लग्नाआधी आलेलं असो किंवा लग्नानंतर निर्माण झालेलं असो. लव्ह मॅरेजमध्ये प्रेम आधी असतं, तर अरेंज मॅरेजमध्ये ते घडवावं लागतं; पण सुरुवात प्रेमानेच व्हावी लागते. प्रेम म्हणजे नात्याचा स्टेपिंग स्टोन; मात्र त्यावरच संपूर्ण इमारत उभी राहत नाही. प्रेम रोज व्यक्त करावं लागतं, जपावं लागतं. जसं शरीर रोज स्वच्छ ठेवतो तसंच नात्यालाही रोज काळजी लागते. प्रेम व्यक्त न झालं तर ते खोलवर असूनही दिसेनासं होतं आणि बाहेर आकर्षण शोधण्याची वेळ येते. काही विवाहांत प्रेमाचा पाया कधीच घातला जात नाही; तिथे प्रश्न प्रेमाचा नसून, त्या नात्याला प्रेमाचं रूप देण्याची तयारी आहे का? हा असतो. खरा संघर्ष विवाहाबाहेर प्रेम शोधण्यात नाही, तर विवाहात राहून प्रेम जिवंत ठेवण्यात आहे.



**ज्या जोडप्यांना सेक्स किंवा इंटिमेसीमध्ये अडचणी आहेत, त्यांना आपण अत्यंत सुरक्षित, समजूतदार वातावरण दिलंय, ज्यामुळे ते खुल्या मनाने त्यांच्या समस्या मांडू शकतात. आपल्या या हमखास यश देणाऱ्या संवादपद्धती बद्दल काय सांगाल?**

आजही सेक्सोलॉजिस्ट-कडे जाणं बहुतेक वेळा फक्त शारीरिक अडचणींसाठीच समजलं जातं. जसं की; इरेक्शन, स्खलन, आकार, किंवा मूत्रविकार यांसारख्या प्रश्नांसाठी. पण सेक्स ही केवळ शारीरिक कृती नसून एक खोल भावनिक अनुभूती आहे. वय वाढलं की शरीरासोबत मनही बदलतं; आणि अनेकदा अडचण शरीरात नसून मनात असते. मात्र त्या सेक्सुअल इमोशनसाठी कुठे जायचं, हे आपल्या समाजात स्पष्टच नाही. राग, नैराश्य, चिंता यांना नावं आहेत; पण लैंगिक भावनांमध्ये गोंधळ झाला, इच्छा कमी-जास्त झाली, व्यक्तच करता येईना तर काय? लहानपणापासून या भावनांना दडपायला शिकवलं गेलं, व्यक्त करायला नाही. परिणामी नात्यांमध्ये ताण, दुरावा आणि गुंतागुंत वाढते.

माझ्याकडे येणारी प्रकरणं खूप गुंतागुंतीची असतात; पण लोक येतात कारण त्यांना खात्री असते की इथे त्यांचं सत्य ऐकलं जाईल. धक्का, न्याय किंवा लाज न बाळगता. प्रत्येकाचं लग्न बाहेरून सारखं दिसलं, तरी बेडरूममधली सत्यं वेगळी असतात. ती सुरक्षितपणे मांडता आली, तर शरीर सैल होतं, मन मोकळं होतं आणि मार्ग सापडतात. म्हणूनच 'सेक्स कोच' म्हणून मी शरीरापेक्षा भावनेला अधिक महत्त्व देते. भारतात या क्षेत्राला ठोस शैक्षणिक चौकट नसली, तरी वैद्यकीय पार्श्वभूमी, आंतरराष्ट्रीय सर्टिफिकेशन्स आणि दहा वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव याच्या बळावर मी ठामपणे सांगू शकते की, जेव्हा बेडरूममध्ये संवाद सुरू होतो, तेव्हा हॉलमधले वाद कमी होतात, नातं फुलतं आणि त्यातील स्पार्क जिवंत राहतो.

**एखादी व्यक्ती सुखी वैवाहिक जीवनात असूनही विवाहबाह्य नात्याकडे वळते, असं का घडतं? हा भावनिक तुटवडा आहे की मानसिक असंतुलन?**

विवाहबाह्य संबंध समजून घेताना 'हे का घडलं?' या प्रश्नाआधी एक मूलभूत सत्य लक्षात घ्यायला हवं; आपण माणूस आहोत, प्राणीविश्वाचाच एक भाग आहोत. विवाह, निष्ठा, नियम, चौकटी या सगळ्या मानवनिर्मित संस्था आहेत; समाज सुसंगत राहावा म्हणून त्या तयार झाल्या. पण हे नियम सगळ्यांनाच तितक्याच सहज पाळता येतील, असं गृहीत धरता येत नाही. नियम असतात, म्हणूनच त्यांचे उल्लंघनही घडते. माणूस मूळचा बहुपर्यायी (polyamorous) प्रवृत्तीचा आहे; तरीही आपण मोनोगॅमीची चौकट स्वीकारली आहे. अनेकदा लग्नात काहीही गंभीर समस्या नसतानाही बाहेरचं आकर्षण निर्माण होतं. कारण निष्ठेची चौकट ही समाजाने दिलेली असली, तरी ती प्रत्येकाने स्वतःसाठी जाणीवपूर्वक स्वीकारलेली असते. त्या चौकटीच्या बाहेर गेलं की गोष्टी लपवाव्या लागतात आणि त्याचे परिणाम अपरिहार्य असतात.

असं काही घडलंच, तर फक्त कारणांचा शोध घेण्यात अडकण्यापेक्षा पुढचा महत्त्वाचा प्रश्न असा असतो तो, निष्ठा तुटल्यानंतर पुढे काय? माफी, विस्मरण, पुनर्निर्मित विश्वास हे सगळं शक्य आहे का? प्रत्येकाची कारणं वेगळी असतात, अनुभव वेगळा असतो. 'असं कधीच व्हायला नको होतं' या हट्टाऐवजी, 'हे घडलं तर नात्याचं पुढे काय?' याकडे पाहणं अधिक प्रगल्भ ठरतं. कारण नाती म्हणजे परिपूर्ण रेषा नाहीत; ती जिवंत आहेत. आणि जिथे माणूस आहे, तिथे चुका, घसरणी आणि पुन्हा उभं राहण्याच्या शक्यताही असणारच.

**प्रेमाच्या शोधात असताना विवाहितांनी स्वतःला हरवून बसणे, हीच बहुतेक 'cheating'ची मूळ मुळं आहेत का?**

फक्त प्रेमाच्या शोधात स्वतःला हरवणं हेच चीटिंगचं एकमेव कारण नाही. चीटिंग हा खूप व्यापक विषय आहे; त्यामागची कारणं अनेक आणि गुंतागुंतीची आहेत. महत्त्वाचं हे नाही की चीटिंग का झाली, तर ती होऊ नये यासाठी नात्यात सुरुवातीपासून स्पेस, मूल्यं आणि स्पष्ट संवाद होता का, प्रेमात पडण्यासाठी प्रेम पुरेसं असतं; पण त्याचं नात्यात रूपांतर होताना आधीच अनेक गोष्टींवर बोलणं गरजेचं असतं. प्रेम कधीच चीटिंग नसतं, प्रेम नेहमी खरं असतं. अडचण येते ती नात्यात ते प्रेम कसं जगायचं, यावर संवाद न झाल्यामुळे.

माणसाची गॅरंटी-वॉरंटी कधीच नसते. जसं काळजी घेतली तरी आजार होऊ शकतो, तसंच नात्यातही संकट येऊ शकतं. चीटिंग नात्याला झालेल्या कॅन्सरसारखं आहे, तो अचानक येऊ शकतो. मात्र प्रश्न तो ''का'' आला हा नसून, त्यावर उपचार करण्याची तयारी आहे का? हा आहे. त्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्यावी लागते. प्रेमाला नेहमी सत्याची जोड असते; ते लपलेलं नसतं. लपवाछपवी नाती आणि विवाहात असते, प्रेमात नाही. लपलेल्या नात्यात राहून प्रेम शोधणं म्हणजे स्वतःशीच अन्याय करणं आहे. म्हणून विवाहबाह्य संबंध हे केवळ पाप नसून, अनेकदा नात्यातून बाहेर पडणं कठीण झाल्यामुळे घेतलेले निर्णय असतात. म्हणून लग्न हे फक्त सर्टिफिकेट किंवा फोटो नव्हे, तर आतून प्रामाणिकपणे जगायची जबाबदारी आहे

**विवाहबाह्य संबंध म्हणजे नेहमीच पाप किंवा चुकीचा निर्णय असतो का? की कधी कधी तो भावनिक सत्याचा भाग असू शकतो? भावनिक जवळीक आणि प्रत्यक्ष 'cheating' यात सीमा कुठे आखली पाहिजे?**

विवाहबाह्य संबंधाचा विचार करताना का घडलं? यापेक्षा आधी आपण स्वतःला ह्यूमन स्पिसीज म्हणून समजून घेणं गरजेचं आहे. समाजात नीट, सभ्यपणे एकत्र राहण्यासाठी आपण लग्नसंस्था निर्माण केली. वेगवेगळ्या धर्मांमध्ये, प्रदेशांमध्ये वेगवेगळे नियम आहेत आणि ते समाजात शांतता, स्थैर्य आणि बंधन निर्माण करण्यासाठी आहेत. नियम नसते तर माणूस स्वभावतः मोनोगॅमस नसताच; तरीही नियम बनवले गेले आणि ते सर्वांनाच पाळता येतील, असं गृहीत धरलं गेलं. पण नियम म्हटले की नियमभंग होणारच. इथे केंद्रस्थानी येते ती ''लॉयल्टी'' व्हॅल्यू, जी आपण स्वतः ठरवतो. त्या चौकटीबाहेर गेलं की परिणाम अटळ असतात. शिक्षा नव्हे; तर समज, माफी आणि योग्य हाताळणी महत्त्वाची. कारण नाती आहेत, तर विघ्न येऊ शकतात. प्रश्न का घडलं? हा नाही तर, कसं टाळायचं आणि घडलंच तर कसं हाताळायचं याचा आहे.

**आजच्या पिढीत Open Relationship, Polyamory, Live-in यासारख्या संकल्पना वाढत आहेत. ही स्वातंत्र्याची दिशा आहे की, भावनिक अस्थिरतेची सुरुवात? सेक्सविषयी नैतिकता आणि स्वातंत्र्य या दोन संकल्पना एकत्र कशा नांदू शकतात?**

सेक्सला नैतिकता, चारित्र्य किंवा स्वातंत्र्याच्या अवजड चौकटीत अडकवण्याची गरजच नाही; कारण सेक्स हा मुळात एक नैसर्गिक इमोशन आहे. मात्र समाजाने त्याला दुहेरी मापदंड लावले आहेत. शब्दांत, सिनेमांत, शिव्यांत तो चालतो; पण प्रत्यक्ष आयुष्यात प्रामाणिकपणे बोललं, निवड केली, तर चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उभं राहतं. लग्न, लिव्ह-इन, ओपन रिलेशनशिप किंवा पॉलीअमरी ही सगळी फक्त लेबल्स आहेत. खरी गरज आहे ती स्वतःच्या सत्याची कबुली देण्याची, स्वतःची व्हॅल्यू

सिस्टिम स्पष्ट करण्याची आणि ती प्रामाणिकपणे जगण्याची.

अनेक लग्नं ही समाजाच्या चौकटीत अडकलेली असतात, जिथे सत्य दडपलं जातं आणि मग विवाहबाह्य नाती जन्माला येतात. घटस्फोट कमी पण दडलेली नाती जास्त, हेच या नैतिकतेचं वास्तव आहे. जिथे सत्य आणि प्रामाणिकपणा आहे, तिथे नैतिकता किंवा स्वातंत्र्य यांवर स्वतंत्रपणे चर्चा करावी लागत नाही. कैद निर्माण झाली की स्वातंत्र्याची गरज भासते. त्यामुळे लेबल्सपेक्षा लॉयल्टी, ट्रुथ आणि ऑनेस्टी या ही मूल्ये अधिक महत्त्वाची आहेत.

**प्राचीन भारतात प्रेम, सौंदर्य आणि काम यांना समान आदर होता. तद्नुषंगाने आजच्या आधुनिक जीवनशैलीत सेक्सला सजगता, संस्कार, संवेदना आणि सज्ञानता या गोष्टींनी जोडून पाहण्यासाठी प्रत्येकाने कोणत्या गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत?**

प्राचीन भारतात प्रेम, सौंदर्य आणि काम यांना समान प्रतिष्ठा होती. आजही सेक्सकडे फक्त कृती म्हणून न पाहता त्याची नवी परिभाषा समजून घेणं गरजेचं आहे. सेक्स हा केवळ शारीरिक फॉर्म्युला नाही; तो राग, भूक, तहान यांसारखाच एक नैसर्गिक इमोशन आहे, जो आधी भावना म्हणून जन्मतो आणि व्यक्त झाला की कृती बनतो. तो अवयवांपुरता मर्यादित नसून नात्यांना घट्ट जोडून ठेवणारी शक्ती आहे. प्रेम व्यक्त करण्याची सगळ्यात प्रभावी, ॲक्शनमध्ये उतरलेली भाषा म्हणजे सेक्स ही समज स्वीकारून ती भावना कशी व्यक्त करायची हे लहानपणापासून शिकवलं, तर अनेक सामाजिक समस्या सुटू शकतात. आज ही भाषा आपण बेडरूमपुरती मर्यादित ठेवली आहे; तिची शब्दसंपदा, संवेदना आणि सन्मान आपण शिकलो नाही.

सेक्सची ही सजग, सुसंस्कृत समज तयार झाली, तर माणूस माणसाकडे माणूस म्हणून पाहू लागेल. हिंसा, भीती आणि अपराध कमी होतील. प्रत्येकालाच सेक्स करावाच लागतो असं नाही; पण प्रत्येकाला हो किंवा नाही स्पष्टपणे व्यक्त करता येणं महत्त्वाचं आहे. अशी मोकळी, सुरक्षित स्पेस तयार झाली, तर परिभाषा बदलेल आणि जग अधिक सुंदर व ❑


